नि.फौ. ख.क्रं.६४१/२०२३
शासन –वि.– नितीन
नि. क्र. ३५ वर

<u>**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची शपथेवर साक्ष**</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : अप्पाराव रुपा राठोड

माझे वय : ५५ वर्षे

व्यवसाय : शेती

राहणार : एकंबी तांडा ता. औसा, जि.लातुर

१. घटना काय व किती तारखेला घडली होती हे मला आठवत नाही. घटना एकंबी तांड्यावर संध्याकाळी घडली होती. आरोपी हे माझ्या बहीणीचे मुले असुन कोणाच्या तरी सांगण्यावरुन ते माझ्याशी किरकोळ वाद करत होते. त्यावेळी मी आरोपींविरुध्द भादा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर मला माहीती नाही. त्याखाली माझा अंगठा आहे. त्यास <u>**नि.क्र. ३६**</u> देण्यात येतो.

<u>**सदरचा साक्षीदार हा घडलेल्या हकीकती प्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे, सरकारी विधिज्ञांनी उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. भारतीय साक्ष अधिनियम, २०२३, चे कलम १५७ नुसार परवानगी देण्यात आली**</u>.

२. हे म्हणणे खरे नाही की, दि २४.०९.२०२३ रोजी संध्याकाळी ८.३० वाजता आरोपींनी येवुन मला भानमती का करतो असे म्हणुन मारहाण केली. त्यावेळी मला, अनिल व जयश्री यांना जखमा झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादमधील अधोरेखांकीत भाग अ बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी <u>**नि.क्र. ३४**</u> प्रमाणे न्यायालयाबाहेर आरोपींसोबत माझी तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की,

नि.फौ. ख.क्रं.६४१/२०२३

शासन –वि.– नितीन

नि. क्र. ३५ वर

माझी आरोपींविरुध्द आज रोजी कोणतीही तक्रार नसुन सदरचा खटला मला पुढे चालवयचा नाही.

**सरतपास पुर्ण**

**आरोपी तर्फे विधिज्ञ श्री एन.एस. राठोड यांच्या मार्फत साक्षीदाराचा उलटतपास नाकारला.**

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2026.07.21 17:50:19 +0530

**औसा** (एस.डी. साबळे)

**दिनांकः २१/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**

**औसा, जिल्हा लातुर**